# <u>प्रेसनोट</u>

दि.०२/१२/२०२२

## सत्र न्यायालयातील वरिष्ठ लिपिकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीगनर पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १८५/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय – २३ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - सचिन अशोक देठे, वय - ३९ वर्षे, पद - वरिष्ठ लिपिक, सत्र न्यायालय, शिवाजीनगर पुणे. (अटक करण्यात आली आहे. ) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | सुरूवातीस - १०,००,०००/-<br>पडताळणीच्या वेळी - २,००,०००/- (दोन लाख रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,५०,०००/- ( दिड लाख रूपये)<br>(त्यामध्ये पंधरा हजार रूपये चलनी नोटा व एक लाख पस्तीस हजार रूपये नकली नोटा) |

पडताळणी दिनांक :- ३०/११/२०२२

सापळा दिनांक :- दि. ०१/१२/२०२२

सापळा ठिकाण :- शिवाजीनगर न्यायालयाचे बाहेरील रस्त्यावर झेरॉक्स दुकानाचे समोर

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदारांचे मावसभावाचे विरूद्ध दाखल असलेल्या खून व मोका केसचा खटला सत्र न्यायालय, शिवाजीगनर पुणे येथे सुरू असून खटल्याच्या साक्षीचे जाबजबाब टायपिंग करताना आवश्यक ते बदल करून त्या केसमधून सुटकेसाठी मदत करतो असे सांगून वरिष्ठ लिपिक सचिन देठे यानी १०,००,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक - वरिष्ठ लिपिक सचिन देठे यानी २,००,०००/- लाख रूपयांची लाचेची मागणी केली व त्यापैकी १,५०,०००/- रूपये स्वीकारल्यावर ताब्यात घेण्यात आले असून वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक ज्योती पाटील तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.